५१० सदाशीव पेठ, पुणे ३०. स्व. तर्कसांख्यतीर्थ पं. रघुनाथशास्त्री कोकजे-प्रवर्तित दूर क्र. – ४४३६९१

धर्मनिर्णय मंडळ ज्ञान प्रबोधिनी कालदर्शिका

दक्षिणायन। उत्तरगोल मासारंभीचे अयनांश २३° ३५' ३८"
चांद्रमास ज्येष्ठ-आषाढ दुर्मति नामसंवत्सर

शालिवाहन शक १९०३ | **राष्ट्रीय आषाढ** | विक्रम संवत् २०३७

सायन सौर – कर्क : नभस् – वर्षा ऋतु
ग्रेगो. जून – जुलै इसवी सन १९८१

	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार
तिथि समाप्ती सूर्य चंद्र दिन विशेष	सौर दि. – विवाह मुहूर्त – १ सोम ४ गुरु ५ शुक्र ६ शनि ८ सोम १३.४० नं. ९ मंगळ १४ रवि १६ मंगळ १७ बुध १८ गरु १९ शुक्र २० शनि १३.५७ प. २१ रवि १६.५३ नं. २२ सोम २४ बुध २६ शुक्र २७ शनि २८ रवि ३१ बुध	चांद्रज्येष्ठ जून पंच १ 22 २४३० उ ०६०६ । म १२४० । अ १९१५ । धनिष्ठा २२४३ । कुंभ १०२७ नं. । चाफेकर बंधूनी क्रूरकर्मा रँडचा वध केला	षष्ठी २ 23 २३५२ उ ०६०६ । म १२४१ । अ १९१५ । शततारका २२५१ । कुंभ ।	सप्त ३ 24 २२४२ उ ०६०७ । म १२४१ । अ १९१५ । पूर्वाभाद्रपदा २२२६ । मीन १६३५ नं. ।	अष्ट ४ 25 २१०० उ ०६०७ । म १२४१ । अ १९१५ । उत्तराभाद्रपदा २१३० । मीन । कालाष्टमी ।	नव ५ 26 १८४८ उ ०६०७ । म १२४१ । अ १९१६ । रेवती २००५ । मेष २००५ नं. ।	दश ६ 27 १६११ उ ०६०७ । म १२४२ । अ १९१६ । अश्विनी १८१४ । मेष ।
तिथि समाप्ती सूर्य चंद्र दिन विशेष	एका ७ 28 १३१३ उ ०६०८ । म १२४२ । अ १९१६ । भरणी १६०२ । वृषभ २१२८ नं. । योगिनी ११	द्वाद ८ 29 १००१ उ ०६०८ । म १२४२ । अ १९१६ । कृत्तिका १३४० । वृषभ । सोमप्रदोष ।	त्रयो ९ 30 ०६४५ उ ०६०८ । म १२४२ । अ १९१६ । रोहिणी १११३ । मिथुन २२०२ नं. । चतुर्दशी प्रारंभ ०६४५ । स २७३१ । शिवरात्री ।	जुलै अमा १० 1 २४३३ उ ०६०८ । म १२४२ । अ १९१६ । मृग ०८५२ । मिथुन । दर्श ३० मार्गी प्लुटो । बुधाचा पूवस उदय	चांद्रआषाढ प्रति ११ 2 २११५ उ ०६०९ । म १२४३ । अ १९१६ । आर्द्रा ०६४६ । कर्क २३२७ नं. । पुनर्वसू २९०४ । चांद्र आषाढारंभ | महाकवी कालिदास दिन	द्विती १२ 3 १९४६ उ ०६०९ । म १२४३ । अ १९१६ । पुष्य २७५५ । कर्क । रथयात्रा मार्गी बुध	तृती १३ 4 १८१४ उ ०६०९ । म १२४३ । अ १९१६ । आश्लेषा २७२४ । सिंह २७२४ नं. । विवेकानंद समाधि दिन
तिथि समाप्ती सूर्य चंद्र दिन विशेष	चतु १४ 5 १७२४ उ ०६१० । म १२४३ । अ १९१६ । पुनर्वस्वर्क: २३१९ । मघा २७३६ । सिंह विनायकी ४	पंच १५ 6 १७१९ उ ०६१० । म १२४३ । अ १९१६ । पूर्वाफाल्गुनी २८३३ । सिंह ।	षष्ठी १६ 7 १७५८ उ ०६१० । म १२४३ । अ १९१६ । उत्तराफाल्गुनी अहोरात्र । कन्या १०५३ नं. । कुमारषष्ठी	सप्त १७ 8 १९१७ उ ०६११ । म १२४४ । अ १९१६ । उत्तराफाल्गुनी ०६१२ । कन्या । विवस्वत ७ ।	अष्ट १८ 9 २१०८ उ ०६११ । म १२४४ । अ १९१६ । हस्त ०८२४ । तूळ २१४१ नं. । दुर्गा ८ ।	नव १९ 10 २३२१ उ ०६११ । म १२४४ । अ १९१६ । चित्रा ११०३ । तूळ	दश २० 11 २५४२ उ ०६१२ । म १२४४ । अ १९१६ । स्वाती १३५७ । तूळ
तिथि समाप्ती सूर्य चंद्र दिन विशेष	एका २१ 12 २८०१ उ ०६१२ । म १२४४ । अ १९१६ । विशाखा १६५३ । वृश्चिक १०१० नं. । हरिशयनी ११ चातुर्मासारंभ	द्वाद २२ 13 ३००८ उ ०६१३ । म १२४४ । अ १९१६ । अनुराधा १९४१ । वृश्चिक । पंढरपूर यात्रा ।	त्रयो २३ 14 अहोरात्र उ ०६१३ । म १२४४ । अ १९१६ । ज्येष्ठ २२१३ । धनु २२१३ नं. । भौम प्रदोष	त्रयो २४ 15 ०७५४ उ ०६१३ । म १२४५ । अ १९१६ । मूळ २४२१ । धनु जयापार्वती व्रतारंभ ।	चतु २५ 16 ०९१६ उ ०६१४ । म १२४५ । अ १९१६ । कर्कार्क: ११०२ । व्यासपूजा गुरुपौर्णिमा पूर्वाषाढा २६०३ । धनु ।	पौर्णि २६ 17 १००९ उ ०६१४ । म १२४५ । अ १९१५ । उत्तराषाढा २७१७ । मकर ०८२४ नं. । संन्यासिन चातु. ।	प्रति २७ 18 १०३४ उ ०६१४ । म १२४५ । अ १९१५ । श्रवण २८०४ । मकर ।
तिथि समाप्ती सूर्य चंद्र दिन विशेष	द्विती २८ 19 १०३० उ ०६१५ । अ १२४५ । अ १९१५ । पुण्यार्क: २२५६ । धनिष्ठा २८२४ । कुंभ १६१७ नं. ।	तृती २९ 20 १००१ उ ०६१५ । म १२४५ । अ १९१५ । शततारका २८१९ । कुंभ संकष्ट चतुर्थी चंद्रोदय २१५१ ।	चतु ३० 21 ०९०६ उ ०६१५ । म १२४५ । अ १९१४ । पूर्वाभाद्रपदा २७५१ । मीन २२०० नं. ।	पंच ३१ 22 ०७४९ उ ०६१६ । म १२४५ । अ १९१४ । सिहायनम् २८१० । उत्तराभाद्रपदा २७०२ । मीन षष्ठी प्रारंभ ०७४९ । स. ३०१० ।	चौकटीतील मांडणीचे विवरण राष्ट्रीय सौर दिनांक चांद्रतिथी → प्रति १५ 5 ← ईसवी दिनांक तिथि समाप्ती → २२०६ सूर्योदय, मध्यान्ह → उ ०६२४ । म १२४२ । अ १८५ । ← सूर्यास्त सूर्यनक्षत्र अयन-संक्रांती रवियुती चंद्रदर्शन तिथिनक्षत्र → रेवती १५२७ । मेष १५२७ नं. । ← परमग्रह (राहू, केतू) ग्रहांचे वक्री/मार्गी भ्रमण उदय/अस्त क्षय इ. → संवत्सरारंभ, शालिवाहन दिनविशेष → गुढी पाडवा । १९०३ प्रारंभ		उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैवहि आत्मनो बंधु: आत्मैव रिपुरात्मन: ॥ आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दु:खं स योगी परमो मत: ॥ ॥ श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मत: ।

आजीबाईचा बटवा

कु. रंजना अभंग

'नेमेचि' येणारा पावसाळा नव्हे तर हिवाळा आणि उन्हाळा यांच्याबरोबर सुद्धा विशिष्ट आजार 'नेमेचि' येत असतात. उदाहरणार्थ, पावसाळ्यात हिवताप, इन्फ्ल्युएन्झा इत्यादि ताप, जंत, आव, जुलाब, अजीर्ण, पोटदुखी असे पोटाचे विकार तसेच दमा यांनी अनेकजण हैराण होतात. हिवाळ्यात पडसे, खोकला, न्यूमोनिया, कानाचे विकार, डोकेदुखी किंवा इतर वातविकार, मलावरोध, त्वचा-विकार यांचे आक्रमण होते. तर उन्हाळ्यात घोळणा फुटणे, डोळे येणे, मूत्रेंद्रियांचे विकार, तसेच गोवर, कांजण्या, टाईफॉईड, कॉलरा, यांच्या साथी येत असतात. त्यामुळे घरामध्ये कुणाचं ना कुणाचं तरी बारीकसारीक दुखणं-खुपणं नेहमीच चालू असतं.

अशावेळी आपल्यापैकी पुष्कळांना म्हणावसं वाटत असेल की –
आजीच्या जवळी असेच बटवा तो औषधी अद्भुत ।
देई काढुनि ती गुणी-जडीबुटी, आहे तुम्हा माहित ?

मात्र, आजच्या काळात ह्या बटव्याची परंपरा खुंटित झाली, याची हळहळ आता आपल्याला वाटायला नको.

आपल्या संस्कृतीत वंशपरंपरेने चालत आलेला 'दादीमाँका बटुआ' पुनश्च आपणाकडे येत आहे. '**प्रबोधन औषधिका**' नावाच्या औषधी-मंजूषेच्या स्वरूपात नवे, आधुनिक रूप लेवून !

तुळस, बेल, दुर्वा, कोरफड, कडुनिंब, अघाडा. इत्यादि वनस्पती आपणापैकी प्रत्येकालाच सुपरिचित 'वृक्षवल्ली अम्हां सोयरी !' अशी आपली भावना. 'सिद्ध' अशा औषधी, वनस्पतीचे अर्क काढून, विशिष्ट पद्धतीने ते अधिक प्रभावी करून त्यांच्यापासून साखरेच्या बारीक गोळ्या बनवायच्या. हीच ती 'प्रबोधन औषधिके' तील सूक्ष्म औषधे !

परंपरेने किंवा आयुर्वेदीय चिकित्सेनुसार ज्या विकारात तुळशीचा किंवा बेलाचा उपयोग त्यांच्या मूळ स्वरूपात केला जातो, त्याच विकारात त्यांच्या एवजी त्यांच्या सूक्ष्म औषधांचा उपयोग करावयाचा.

दवा है पुरानी, पुरतोंने भी मानी ।
नया रूप लेकर और असरदार बनी ।

या नव्या रूपात औषधींचा प्रभाव आणि उपयुक्तता कितीतरी वाढते. ही औषधे 'सेंद्रिय' आणि 'सौम्य' असल्याने शरीरात सहज शोषली जातात. त्यांचे Side-effects किंवा Reactions इत्यादी कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत–ती विशेष 'सुपरिणामी' आहेत. ती घेण्यास आणि (प्रवास इत्यादि) कोठेही नेण्यास 'सुलभही' आहेत. इतके असून शिवाय 'स्वदेशी, आणि 'स्वस्त !' आपल्या देशातील अगदी खेडयापाडयातील लोकांनाही वापरण्याइतकी 'सोपी' आहेत आणि आजच्या धावपळीच्या, घाईगर्दीच्या काळात शहरी माणसालाही ही 'सुटसुटीत' औषधे आवडतील अशी आहेत.

ही औषधे घेण्याची पद्धतीही किती सोपी आहे ! माहितीपत्रकात दिल्यानुसार औषध निवडायचे आणि ५-६ गोळ्यांची एक मात्रा, याप्रमाणे ४ मात्रा दिवसभरात तोंडात टाकून चघळायच्या. आपण अंथरूणास अगदी खिळून असू तर २० गोळ्या भांडेभर पाण्यात टाकून चमचा चमचा पाणी अर्ध्या अर्ध्या तासाच्या अंतराने घ्यावयाचे. मात्र औषध चालू असताना, आजार वाढेल असे कुपथ्य खाण्यापिण्यात टाळायला हवे.

' आप अगर मरीज तो बनो आपही डॉक्टर ! '

आपणच आपले वैद्य बनण्यासाठी 'प्रबोधन औषधिके' च्या माहितिपुस्तिकेतील ही निवडक माहिती वाचाच तर आपण –

पडशावर तुळस : पडसे हा दिसावयास अत्यंत साधा परंतु अतिशय त्रासदायक व चिकट आजार. इंग्रजीमध्ये म्हण आहे की पडसे बरे होण्यासाठी निदान सात दिवस तरी लागतातच. पण तुळशीच्या सूक्ष्म औषधांबाबत असा अनुभव आहे की, कितीही भयंकर व जोरदार पडसे असले, ते कितीही वाहत असले तरी ते तुळशीच्या गोळ्यांनी त्वरित एक दिवसातच सुकते.

खोकल्यावर अडुळसा : 'जोवर जगात अडुळसा आहे, तोपर्यंत कोणताही श्वसनविकार झालेल्या रूग्णांना निराश होण्याचे कारण नाही' असे एक संस्कृत वचन आहे. सर्दीपडशातील भयंकर शिंका अडुळशाने थांबतात. तीव्र खोकल्यात छातीत दाटलेला कफ तसेच डांग्या खोकल्यातील उबळीसुद्धा अडुळशाने कमी होतात. घसा बसण, ब्रॉंकायटिस, न्यूमोनिया, क्षय या गंभीर विकारातही अडुळशाचा निश्चित गुण येतो

याशिवाय भाजलेल्या लवंगांची पूड मधातून घणे, विडयाच्या पानांचा रस चघळणे, ज्येष्ठमधाची कांडी तोंडात धरणे इत्यादी घरगुती उपायही खोकल्यासाठी योजावेत.

जंतावर वावडिंग : पुष्कळदा लहान मुलांना जंत होतात, मग ती किरकिर, चिडचीड करतात, दात खातात. नाक खाजवतात, झोपेत दचकतात, भूक अजिबात लागत नाही किंवा खूप भूक लागते, जेवूनही समाधान होत नाही, लघवी तांबडी किंवा पिवळी होते, ताप येतो. अशा वेळी वावडिंगाच्या गोळ्या काही दिवस नियमाने अवश्य घ्याव्यात.

काही मुलांची 'हातापायाच्या काड्या व पोट वाढ्या' अशी स्थिती बनते, खाल्लेले अंगी लागत नाही, त्यांना वावडिंग आणि अनंतमूळ यांच्या गोळ्या दिल्यास ती लवकरच सुधारतात.

जुलाबावर बेल : वारंवार शौचास होत असेल तर बेलफळाचे सरबत आणि तसेच बेलाच्या सूक्ष्म गोळ्या अत्यंत गुणकारी आहेत.

आमांशावर कुडा : प्राचीन काळापासून कुडा आवेवर उपयुक्त ठरलेला आहे. कुडाच्या गोळ्यांनी आवेतील श्लेष्मा व रक्त यांचे प्रमाण कमी कमी होत जाते. पोटात मुरडणे थांबते. आव समूळ नाहीशी होते. (पुढील पानावर)

विश्वव्यापी कालगणना

(मागील पानावरून चालू)

Annual म्हणजे वार्षिक. यात 'अन्न' हा वार्षिक अशा अर्थाचा धातू यौरोपीय भाषात रूढ होण्याचे कारण त्या प्रांतातील हिंदुशासनात वर्षारंभी अन्नपूर्णेची पूजा करीत. म्हणून अन्नपूर्णेची (पूजा) अशा अर्थाने Annual हा शब्द रुढ झाला.

अशा तऱ्हेने एका क्षणापासून वर्षापर्यंतची यच्चयावत् सर्व कालगणना प्राचीन हिंदुप्रथेप्रमाणे आजही जगभर रूढ असल्याचे दिसेल.

एवढेच नव्हे तर युरोपमध्ये रात्री १२ वाजल्यापासून दिवसाचे तासगणन करतात ते तेथील कृष्णपूजेच्या महत्त्वामुळे. राक्षसी अत्याचारांच्या युगातून एका नव्या सुखी युगाचा प्रात:काल झाला असे समजून कृष्णजन्माच्या मध्यरात्रीच्या ठोक्यापासून युरोपखंडात नवप्रभाताची सुरवात मानतात.

तसेच a. m. म्हणजे ante meridion अर्थात माध्यान्हापूर्वीचा काळ समजतात व p. m. म्हणजे post meridion हा मध्यान्हानंतरचा काळ समजतात ante meridion म्हणजे 'ख — रेषेच्या अलिकडे व post meridion म्हणजे "ख–रेषेच्या पलिकडे" असा अर्थ होतो पण ख–रेषेच्या अलिकडे-पलिकडे जाणारा कोण ? हे कोडे a. m. व p. m. ह्या यौरोपीय विवरणात काही उलगडत नाही, उलट आमचे म्हणणे असे आहे की a. m. व p. m. ही संस्कृत आद्याक्षरे असून त्यांच्यावरून 'आरोहणम् मार्तंडस्य' (a. m.) व 'पतनम् मार्तंडस्य' (p. m.) हे संस्कृत अर्थ अभिप्रेत आहेत. माध्यान्हापर्यंत सूय ख–रेषेपर्यंत वरवर चढताना दिसतो म्हणून 'आरोहणम् मार्तंडस्य' (म्हणजे a. m.) व माध्यान्हानंतर सूर्य ख–बिंदूपासून क्षितिजाकड खालीखाली येताना दिसतो म्हणून माध्यान्हानंतरच्या काळास p. m. (पतनम् मार्तंडस्य) म्हणतात.

अशा तऱ्हेने आजतागायत जगभर प्रचलित असलेल्या कालगणनेकडे जरी दृष्टिक्षेप केला तरी कृस्तपूर्व काळी लक्षावधी वर्षे सबंध विश्वात हिंदु शासन व हिंदु शिक्षण होते याबद्दल शंका उरत नाही. तरी हा इतिहास शिकवला जात नाही. तो शिकवला जाणे आवश्यक आहे.

SHREE GANESH
PAPER COMPANY
493, Shaniwar Peth,
POONA - 411030.

Stockists of All Varieties of Paper, Boards & Stationery Suppliers to all Educational Institutions of Reputation.

Phone : 470149

With Best Compliments from :

PARASHURAM
PROCESS

OFF-SET PRINTERS

16 A, SHIVAJINAGAR, PUNE-5.

Phone : 53855

सहकार मुद्रणालय, ५४०, गणेश पेठ, पुणे २.